*Review Of Research*
Vol. 2, Issue. 7, April. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *महाराष्ट्रातील महिलांच्या सबलीकरणात समाजसुधारकांचे योगदान*

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

***सारांश* :**
महाराष्ट्र राज्य हे महिलांच्या हक्कांबाबत अग्रेसर असून समाजातील विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे. महाराष्ट्र राज्याला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी असून महात्मा फुलेंसारख्या पुरोगामी विचारसरणीच्या मंडळींनी महिला सक्षमीकरणासाठी पुरोगामी विचारसरणीचा पाया स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच रचलेला आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. स्त्रियांना संधी आणि स्वातंत्र्य देण्यात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिले आहे.

## *प्रस्तावना*

महाराष्ट्रात स्त्रियांना सन्मानाची वागणूक देऊन त्यांना प्रोत्साहीत करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महाराष्ट्र राज्य महिला सक्षमीकरणाच्या कायक्रमात इतर राज्यांचा विचार करता अग्रेसर असून मुख्यत्वे माता बाल संगोपन, महिला आरोग्य, महिलांसाठी विकास योजना इत्यादीबाबत पुढारलेले दिसून येते. राष्ट्रीय विकास कार्यक्रमांतर्गत एकात्मिक ग्रामीण विकास, डॉकरा, ट्रायसेम, नेहरू रोजगार योजना, एकात्मिक बाल विकास बालकांच्या जन्मापूर्वी व जन्मानंतर त्यांचा आहार, लसीकरण, प्रसूतीपूर्व काळजी यांसदर्भात महाराष्ट्राने उत्कृष्ट प्रगती केली आहे.

## *महिला सबलीकरणात महाराष्ट्रातील समाजसुधरकांचे योगदान*

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री सुधारणेचे नेतृत्व पुरुषांकडे होते. ज्या घरातील पुरुष स्त्री सुधारणेस अनुकूल होते त्या घरातील स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. याच काळात स्त्रीच्या दास्यत्वाची, परवशेतेची जाणीव महाराष्ट्रातील विचारवंतांना होऊ लागली होती. स्त्रियांना दायत्वातून मुक्त करण्यासाठी स्त्रीशिक्षण आवश्यक असल्याचे विचार मांडले जाऊ लागले. स्त्री शिक्षणाबाबत सर्वात महत्त्वाची कामगिरी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केली आहे. समाजाचा दोष पत्करून त्यांनी ऑगस्ट 1948 मध्ये बुधवार पेठ पुणे येथे मुलींची पहिली शाळा स्थापन केली.

1840 ते 1900 हा सामाजिक प्रबोधनाचा काळ मानला जातो. महाराष्ट्रात लोकहितवादी गो. ह. देशमुख, ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, विष्णुशास्त्री पंडित, भांडारकर, न्या. रानडे, आगरकर या थोर समाजसुधारकांनी स्त्रियांसाठी स्वातंत्र्याच्या वाटा खुल्या केल्या. ताराबाई शिंदे यांनी 1882 मध्ये स्त्री पुरुष तुलना नावाची पुस्तिका लिहून स्त्रिया सर्व बाबतीत पुरुषांच्या बरोबरीच्या असतात हे सिद्ध केले. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, म. कर्वे, आगरकर, ह. ना. आपटे, म. ज्योतिबा फुले यांनी सतत सभा व लिखण या मार्गाने समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची सुरूवात झाली. विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्योद्वार हे जीवनाचे ध्येय मानले व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात कायदे केले. पं. रमाबाई रानडे, यशोदाबाई भट, येसूताई सावरकर, पारूबाई दास्ताने, पार्वतीबाई ठकार यांचेही स्त्री चळवळीतील भरीव योगदान आहे. महाराष्ट्रातील पुरुषांची प्रेरणा आणि खडतर मार्गावरून चालण्याची काही स्त्रियांनी दाखवलेली जिद्द यामुळे महाराष्ट्रात सुधारणेचे वारे वाहू लागले.[1]

**Title:** Ekgkjk"Vªkrhy efgykP;k lcyhdj.kkr lektl/kkjdkp ;kxnku **Source: Review of Research [2249-894X]** vfuy ekf.kdjko cSlk.ks **yr:2013 vol:2 iss:7**

### आंतरराष्ट्रीय महिला दशकाचा परिणाम

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांचा पाश्चात्य स्त्री मुक्तिवादी चळवळीशी व विचारांशी संपर्क आला. स्त्रियांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर मते, चर्चा होऊ लागली. महाराष्ट्रात आज अनेक गट स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करीत आहेत. त्यातले 90 टक्के गट आंतरराष्ट्रीय महिला दशकाची निमिती आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर झाल्यावर महाराष्ट्रात स्त्री चळवळीला वेगळे रूप आले. स्त्री ही संपूर्ण समाजाचा एक अविभाज्य घटक आहे हा दृष्टिकोन मांडणाऱ्या स्त्रियांच्या अनेक संस्था महाराष्ट्रात या दशकात वाढल्या. अखिल भारतीय महिला फेडरेशन, समाजवादी महिला सभा, श्रमिक महिला संघ, महिला दक्षता समिती, स्त्री मुक्ती संघटना, नारी समता मंच, क्रांतीकारी महिला संघटना अशा अनेक संघटना आंतरराष्ट्रीय महिला दशकात महाराष्ट्रात वाढू लागल्या. स्त्री पुरुष समानता जनमानसात रुजविण्यासाठी स्त्री मुक्ती यात्रा आयोजित करण्यात आली होती. विदर्भातील बुलढाणा, मलकापूर, अकोला, वाशिम, पुसद, यवतमाळ, वणी, पांढरकवडा, भद्रावती, चंद्रपूर, हिंगणघाट, नागपूर, कन्हान, वर्धा, पुलगांव, अमरावती आणि हिवरखेड या गावी या यात्रेचे कार्यक्रम झाले. महाराष्ट्रात ग्रामीण भागापर्यंत स्त्रीमुक्ती यात्रा थोड्याफार प्रमाणात पोहोचली.[2]

### महाराष्ट्र राज्य महिला आयोग

भारतीय संविधानातील महिलासंबंधीच्या तरतूदींची तसेच महिलांचे कल्याण आणि संरक्षण या संबंधींच्या इतर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी जागरूकतेने करण्यासाठी, राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर सन 1993 मध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांचा आर्थिक, सामाजिक व राजकीय दर्जा उंचावण्यासाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी व विकासासाठी कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे, महिलांना मोफत कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन देणे, सुधारग्रहे, तुरूंग, महिला सस्था यांची तपासणी करणे, महिलांशी संबंधीत व महिलांवर परिणाम होणाऱ्या बाबींच्या संदर्भात शासनास सल्ला / शिफारस करणे ही महिला आयोगाची प्रमुख कार्ये आहेत.

आज राज्य महिला आयोगामार्फत महिलांसाठी शिबिरे, कार्यशाळा, मेळावे आयोजित केले जातात. महिलांवरील अत्याचार, देवदासींचे पुनर्वसन, महिलांच्या आरोग्यविषयक समस्या या विषयावर व्याख्याने व मेळावे आयोजित केले जातात. महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविले जाते, महिला न्यायालयांनाही आयोगामार्फत मार्गदर्शन केले जाते.[3]

### महाराष्ट्र शासनाचे महिलांसंबंधीचे धोरण 1994

विकासाच्या प्रवाहात महिलांनाही न्याय्य प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी सर्वकश महिला धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होय. जून 1994 मध्ये महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महिला धोरण जाहीर केले. या धोरणामुळे महिलांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यास मदत झाली. महिलांना माालमत्तेत हकदार बनविण्यात आले. वडिलांबरोबर आईचे नावही लावणे बंधनकारक झाले. त्यामुळे महिलांना सामाजिक दर्जा प्राप्त झाला. 1994 च्या धोरणात महिलांविरोधी अत्याचारांचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न करणे, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, प्रसार माध्यमांचा परिणामकारकरित्या वापर करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आणि सहकारी संस्थामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. महाराष्ट्र शासनाने आखलेले महिला धोरण हे महिला विकासाच्या दिशेने टाकलेले प्रथम पाऊल होते. स्त्रियांबाबत आत्तापर्यंत असणारा दृष्टिकोन बदलला व कल्याणकारी कल्पनेची जागा विकसनशील दृष्टिकोनाने घेतली. महाराष्ट्र शासनाने महिला व बालकल्याण विभागाचे नाव बदलून महिला व बाल विकास विभाग असे ठेवले. कल्याणाकडून विकासाकडे व विकासाकडून महिला सबलीकरणाकडे नेण्याच्या दृष्टीने महिला धोरण उपयुक्त ठरले.[4]

### महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण 2001

1994 च्या धोरणात असा निर्णय घेण्यात आला होता की, दर तीन वर्षांनी या धोरणांतर्गत घेतलेल्या निर्णयाची फेर तपासणी करून त्यात आवश्यकतेनुसार बदल घडवून आणण्यासाठी सुधारीत धोरण जाहीर करावे. त्यानुसार व बदलत्या आर्थिक स्थितीनुसार झालेल्या प्रगतीचा आढावा घेऊन 2001 मध्ये सुधारित महिला धोरणची आखणी केली. या धोरणाद्वारे महिला सक्षमीकरणासाठी शासकीय योजना आणि कृती कार्यक्रमाबरोबरच स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विशेष प्रयत्नाला सुरुवात झाली.

स्माजात स्त्री वेगवेगळ्या कारणांनी अन्यायाला बळी पडते, तसेच बेकारी, कुपोषण, महागाई यामुळे महिला अडचणीत येत असतात. महिलांवरील अत्याचार रोखणे, संरक्षण देणे, समाजातील विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित करणे, स्त्रियांच्या बौद्धिक व व्यक्तिगत क्षमतांचा विकास करून एक उत्पादक घटक म्हणून स्थान मिळवून देणे,

गाव विकासात महिलांचा सहभाग वाढविणे, महिलांची आर्थिक उन्नती साधणे, क्षमता संवर्धित करणे ही महिला धोरणची प्रमुख उद्दिष्टे आहेत. महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यता बचत गटावर आधारित विकास योजनांना महत्त्व देण्यात आले आहे. ग्रामीण भागात बचतगटाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात. 73 व्या व 74 व्या घटना दुरुस्तीचा फायदा घेऊन महिला पंचायत राज संस्थांमध्ये निवडून येतात. म्हणून 2001 च्या धोरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी मुख्यत्वे स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती, ग्रामसभा सक्रिय करण्यासाठी ग्रामसभेपूर्वी महिला ग्रामसभा घेण्याचे आदेश देण्यात आले. 50 टक्के महिलांनी दारूची दुकाने बंद करण्याची मागणी केल्यास त्याबाबतची कार्यवाही 30 दिवसात करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. महानगरपालिकेच्या व्यापारी गाळ्यांपैकी 30 टक्के गाळै महिलांसाठी राखून ठेवण्याचे आदेश देण्यात आले, महिला आर्थिक विकास मंडळाची पुनर्रचना करून शिखर संस्था म्हणून घोषित करण्यात आले. या सर्व कार्यवाहीमुळे महिला सबलीकरणास मदत झाली आहे.5

### *महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना*

केंद्रसरकारप्रमाणे राज्यसरकार विकासाच्या योजना आखून त्या योजनांची अंमलबजावणी करते. विकासाची जबाबदारी घटनेनुसार राज्य सरकारवर असल्यामुळे राज्यशासन विविध योजना आखते. महिला विकासाच्या स्वतंत्र योजना महाराष्ट्र राज्य महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविल्या जातात..

### *संदर्भसूची*

1.आपटे ज. श. आणि रोडे पु, महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2008, पृ. 9–11

2.तत्रैव, पृ. 48.

3.फडके वर्षा, महिलांना सक्षम करणारा महिला आयोग, लोकराज्य, मार्च 2010, पृ. 22–23.

4.पाटील ली., मुलींचा बदलता सामाजिक दर्जा, निरंधर शिक्षण धारा, त्रैमासिक, फेब्रुवारी–मार्च 2010.

5.महिला सक्षमीकरण : काही कायदे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.



***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

